N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चोपडा शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2022 20:49 बजे

2\.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3\. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 16/02/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2022

**Time From (वेळेपासून):** 15:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/02/2022 **Time (वेळ):** 20:37 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 041 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2022 20:37 बजे

4\. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5\. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** चोपडा तहसिल कार्यालयाचे बाहेर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6\. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** योगराज वासुदेव इंगळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी स., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मितावली पोष्ट टेंवगाव तालोपडा,चोपडा,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मितावली पोष्ट टेंवगाव तालोपडा,चोपडा,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषण विलास पाटील | | | 1. पंकजनगर मुकबधिर विद्यालय समोर प, चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. दराच्या 20 चलनी नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any** (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

चोपडा शहर पो.स्टे. गुरनं. 55/2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणेफिर्यादी:- योगराज वासुदेव इंगळे वय 34 वर्ष धंदा शेती रा. मितावली पोष्ट टेंवगाव जि. जळगाव आरोपी:- भुषण विलास पाटील वय 32 वर्षे धंदा नोकरी तलाठी सजा टेंवगाव ता. चोपडा जि. जळगाव रा. पंकजनगर मुकबधिर विद्यालय समोर पंकज रेसीडेन्सी जुना धनवाडी रोड चोपडा मुळ रा. जुनोने ता.जि. धुळे (एक खाते महसुल विभाग वर्ग 3)गुन्हा घडला तारीख वेळ व ठिकाण:- दिनांक 16/02/2022 रोजी 15/32 वाजता चोपडा तहसिल कार्यालयाचे बाहेर समर्थ टी हाऊस या चहाचे हटेल मध्ये लाचेची मागणी रक्कम:- 10,000 रुपये रोख स्वीकारली रक्कम :- 10,000/- रुपये त्यात 500 रु. दराच्या 20 चलनी नोटा सापळा व तपास अधिकारी:- एस.के. बच्छाव पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो जळगाव गुन्ह्याची थोडक्यात हकिगत:- यातील फिर्यादी यांचे ट्रक्टर असुन सदर ट्रक्टरने ते वाळु वाहतुक करतात आरोपी हे फिर्यादी यांना भेटले त्यावेळी आरोपीने फिर्यादी यांना सांगीतले की, तुमचे गाव हे माझ्या सजा मध्ये येते तुम्ही तुमच्या ट्रक्टरने मितावली येथील तापी नदी पात्रातुन रेतीची (वाळुची) अवैध वाहतुक करतात तुम्हालाजर मितावली येथील तापी नदी पात्रातुन अवैध रेती वाहतुक करायची असेल तर दरमहा 10,000/- रुपये मला द्यावे लागतील असे सांगुन फिर्यादी कडेस 10,000/- रुपये लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दिनांक 16/02/2022 रोजी ला.प्र.वि जळगाव कार्यालया कडेस लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीची दिनांक 16/02/2022 रोजी ला.प्र.वि. जळगाव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचे ट्रक्टरने वाळुची अवैध वाहतुक करु देण्यासाठी व ट्रक्टरवर कायदेशीर कारवाई न करण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस पंचा समक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी केली सदर लाचेची रक्कम आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचा समक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. वगैरे मजकुरचे फिर्याद वरुन गुन्हा रजिष्टरी दाखल करण्यात आला असुन खबरी रिपोर्ट मा. न्यायालयात पाठविण्याची तजविज ठेवली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास एस.के. बच्छाव पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो जळगाव हे करीत आहेत. सदर सविस्तर टंकलिखीत केलेली फिर्याद सोबत जोडली आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): avtarshing thakurshing charan(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): avtarshing thakurshing chara
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठा.अंमलदार
चोपडा शहर पो.स्टे

फिर्याद

चोपडा शहर पोलीस स्टेशन
दिनांक १६.०२.२०२२

**मी योगराज वासुदेव इंगळे, वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती रा.मितावली पो.देवगांव ता.चोपडा जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई,वडील, पत्नी व मुलाबाळांसह राहतो. दि.१५.०२.२०२२ रोजी सायंकाळी मी जळगांव अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेशी संपर्क साधुन देवगांव येथील तलाठी भुषण पाटील यांचे विरुध्द लाचे संबंधी तक्रार असल्याचे कळविले होते.तेव्हा मी पाटील साहेब यांना दि.१६.०२.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता आपणास चोपडा ते यावल रोडवरील चोपडा शहरापासुन सुमारे १ कि.मी. अंतरावरील आडगाव फाटयाजवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.१६.०२.२०२२ रोजी सकाळी १०.३० वा.मी माझे स्वत:चे मोटार सायकलसह चोपडा ते यावल रोडवरील चोपडा शहरापासुन सुमारे १ कि.मी. अंतरावरील आडगाव फाटयाजवळ उपस्थित होतो. तेव्हा एक खाजगी तवेरा वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात असलेले श्री.पाटील साहेब यांनी मला माझे नाव गाव विचारले व मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी स्वत:ची ओळख करुन दिली. तसेच श्री.पाटील साहेब यांनी वाहनात उपस्थीत असलेले पोलीस निरीक्षक बच्छाव साहेब यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव साहेब यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वत:चे हस्ताक्षरात को-या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

मितावली ता. चोपडा येथे माझे स्वत:चे नावे शेती असुन मी शेती व्यवसाय करतो. माझे स्वत:चे नावे शेती कामासाठी स्वराज कंपनीचे ट्रॅक्टरसह ट्रॉली असुन सदर ट्रॅक्टरचा क. एमएच १९ ए.पी – ५५९२ असा आहे. शेती कामाचे व्यतीरीक्त मी इतर वेळेस नमुद ट्रॅक्टरने तापी नदीपात्रातुन रेतीची (वाळुची) वाहतुक करीत असतो.दि.०७.०२.२०२२ रोजी मी माझे कामानिमीत्त देवगाव येथे गेलो असता, मला सदर ठिकाणचे तलाठी भुषण पाटील हे भेटले, तेंव्हा त्यांनी मला सांगितले की, तुमचे गाव हे माझ्या सजा मध्ये येते, तुम्ही तुमच्या ट्रॅक्टरने मितावली येथील तापी नदीपात्रातुन रेतीची (वाळुची) अवैध वाहतुक करतात. तुमचे ट्रॅक्टर जर रेतीची (वाळुची) अवैध वाहतुक करतांना सापडले तर मी तुमचे ट्रॅक्टर जमा करून केस करुन टाकेल असे सांगुन तुम्हाला मितावली येथील तापी नदीपात्रातुन जर अवैध रेती (वाळु) वाहतुक करायची असेल तर तुम्ही मला चालु महिन्याचा हप्ता म्हणुन १०,०००/– रूपये आणुन द्या व त्यानंतर दरमहा १०,०००/–रु. मला द्यावे लागतील. तुम्ही जर दरमहा १०,०००/–रु.मासिक हप्ता दिला नाही तर मी तुम्हाला मितावली येथील तापी नदीपात्रातुन ट्रॅक्टरने रेतीची (वाळुची) वाहतुक करु देणार नाही. व तुमच्या ट्रॅक्टरवर कायदेशीर कारवाई करुन तुमचे ट्रॅक्टर जप्त करुन टाकेल असे सांगितले.

त्यावेळी तलाठी भुषण पाटील हे मला माझे ट्रॅक्टरने मितावली येथील तापी नदीपात्रातुन रेतीची (वाळुची)वाहतुक करु देण्यासाठी व ट्रॅक्टरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याचे मोबदल्यात माझे कडेस १०,०००/–रु. लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगितले तेव्हा तलाठी भुषण पाटील यांनी तुम्ही मला तहसिल कार्यालय चोपडा येथे येवुन भेटा असे मला सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून निघुन आलो होतो.

माझे ट्रॅक्टरने मितावली येथील तापी नदीपात्रातुन रेतीची (वाळुची)वाहतुक करु देण्यासाठी व ट्रॅक्टरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात तलाठी भुषण पाटील यांना १०,०००/–रु.लाच रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर तलाठी भुषण पाटील यांना पहीला हप्ता म्हणुन १०,०००/–रु.लाचेची रक्कम दिली नाही तर ते मला माझे ट्रॅक्टरने मितावली येथील तापी नदीपात्रातुन रेतीची (वाळुची)वाहतुक करु देणार नाही. अथवा माझे ट्रॅक्टरवर रेती (वाळु) वाहतुकीची केस करतील म्हणुन मी नाईलाजाने तलाठी भुषण पाटील यांना १०,०००/–रु. लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. मी तलाठी भुषण पाटील यांची भेट घेण्यास त्यांनी सांगितल्या प्रमाणे तहसिल कार्यालय, चोपडा येथे आज रोजी जाणार आहे. बाबत तक्रार दिली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह तलाठी भुषण पाटील यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय चोपडा येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्र १ यांचेसह तहसिल कार्यालय,चोपडा येथे गेलो.त्यानंतर मी माझी मोटार सायकल चोपडा तहसिल कार्यालयाच्या बाहेर उभी केली. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे चोपडा तहसिल कार्यालयाच्या आवारात गेलो. तेव्हा तलाठी भुषण पाटील हे तहसिल कार्यालयाचे आवारातच उभे असल्याचे दिसले. तेव्हा मी पंच क्र.१ याचे सह तलाठी भुषण पाटील यांचे जवळ जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा माझेत व तलाठी भुषण पाटील

चोपडाशहर पो. स्टे. CCTNS गुरन. 55/2022 भ्र.प्र. अधि. सन. १९८८ चे कलम. ७ प्रमाणे CCTNS. नोंदक्र-41 वर वेळ. 20/37 वा दाखल केला आहे.

PSO
ठाणे अंमलदार
चोपडा शहर पो.स्टे

यांचेत माझे ट्रॅक्टरने वाळू वाहतुक चालु करण्याचे कामाविषयी चर्चा झाली. तेव्हा तलाठी भुषण पाटील यांनी ट्रॅक्टरने वाळू वाहतुक करु देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस १०,०००/–रु.लाच मागणी केली. तेव्हा मी त्यांना पैशांची व्यवस्था अर्धा/पाऊण तासात करतो असे सांगुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व तलाठी भुषण पाटील यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व बच्छाव साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तलाठी भुषण पाटील यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली १०,०००/–रु. रक्कम (त्यात ५००/–रु.दराच्या २० नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/नासिर देशमुख यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह तलाठी भुषण पाटील यांना त्यांचे मागणी प्रमाणे १०,०००/–रुपये लाच रक्कम देण्यासाठी चोपडा तहसिल कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह तहसिल कार्यालय,चोपडा येथे गेलो. मी माझी मोटार सायकल चोपडा तहसिल कार्यालयाच्या बाहेर उभी केली. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे चोपडा तहसिल कार्यालयाच्या आवारात गेलो. तेव्हा बच्छाव साहेब यांनी चोपडा तहसिल कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता.

तेव्हा तलाठी भुषण पाटील हे चोपडा तहसिल कार्यालयाच्या आवारात दिसुन आले नाही. म्हणुन मी व पंच क्र.१ असे तहसिल कार्यालयात असलेल्या एका हॉल जवळ जावुन पाहीले असता सदर ठिकाणी बैठक चालु असल्याचे दिसले. त्यामुळे मी व पंच क्र.१ असे तहसिल कार्यालयाचे आवारात तलाठी भुषण पाटील यांची वाट पाहत थांबुन राहीलो. त्यानंतर सुमारे एक ते सव्वा तासानंतर बैठक संपल्याने तलाठी भुषण पाटील हे बाहेर आले. तेव्हा मी व पंच क्र.१ असे त्यांचे जवळ गेलो तेव्हा तलाठी भुषण पाटील यांनी उजव्या हाताचा अंगठा व पहील्या बोटाने ईशारा करुन पैसे आणले आहेत का? असे विचारले तेव्हा मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिश्यास हात लावुन पैसे आणले असल्याचे इशा–याने सांगितले. त्यानंतर मी त्यांना चहा घेवु असे सांगितले. त्यानंतर तलाठी भुषण पाटील, मी व पंच क्र.१ असे तहसिल कार्यालयाच्या आवारातुन निघुन खालील बाजुस असलेल्या समर्थ टी हाउस या चहाच्या हॉटेल येथे गेलो. दरम्यान माझेत व तलाठी भुषण पाटील यांचेत माझे ट्रॅक्टर चालु करण्याविषयी चर्चा झाली. त्यानंतर आम्ही सर्व जण सदर चहाचे हॉटेल मध्ये जावुन बसलो, त्यानंतर मी माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाच रक्कम १०,०००/–रु. उजव्या हाताने बाहेर काढून सदर लाच रक्कम तलाठी भुषण पाटील यांचे समोर धरली व घ्या दहा हजार रुपये, मोजुन घ्या, असे सांगुन सदर लाचेची रक्कम तलाठी भुषण पाटील यांना दिली तेव्हा तलाठी भुषण पाटील यांनी सदर १०,०००/–रु.लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली व मोजुन घेवु का? असे विचारुन सदर लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी तलाठी भुषण पाटील यास रंगेहाथ पकडले. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी तलाठी भुषण पाटील यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी तलाठी भुषण पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव भुषण विलास पाटील, वय ३२, व्यवसाय नोकरी, तलाठी, सजा देवगांव ता.चोपडा जि.जळगांव रा.पंकज नगर, मुक बधीर विद्यालयासमोर, पंकज रेसीडेन्सी, जुना धनवाडे रोड, चोपडा जि. असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने तलाठी भुषण पाटील यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई जळगांव येथे जावुन अँन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये माझे,आरोपी भुषण पाटील व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे.तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी भुषण विलास पाटील, तलाठी सजा देवगांव ता.चोपडा जि.जळगांव यांनी दि.१६.०२.२०२२ रोजी पंचासमक्ष माझे ट्रॅक्टरने रेतीची (वाळुची)वाहतुक करु देण्यासाठी व ट्रॅक्टरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात माझे कडेस १०,०००/–रुपये लाच मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी भुषण पाटील यांनी दि.१६.०२.२०२२ रोजी १५.३२ वा. चोपडा तहसिल कार्यालयाचे बाहेरील समर्थ टी हाऊस या चहाच्या हॉटेलमध्ये स्वत: स्विकारली आहे.म्हणुन माझी आरोपी भुषण पाटील, तलाठी, सजा देवगांव ता.चोपडा जि.जळगांव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष
एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही
(योगराज बाळकृष्ण इंगळे)